## मेट्रो ३च्या पहिल्या टप्प्यातील सर्व गाड्या जून २०२३पर्यंत ताफ्यात

# 'आरे-बीकेसी'साठी लागणार नऊ गाड्या

म. टा. खास प्रतिनिधी

**मुंबई :** मेट्रो-३ प्रकल्पातील आरे ते बीकेसी उत्तर, या पहिल्या टप्प्यासाठी एकूण नऊ गाड्यांची गरज भासणार आहे. त्यापैकी पहिल्या गाडीच्या सक्षमतेच्या चाचण्या पूर्ण झाल्या आहेत. आता दुसरी गाडी लवकरच मुंबईत दाखल होणार आहे. मेट्रो-३साठी (आरे ते कफ परेड) 'अल्स्टॉम' कंपनीकडून एकूण ३१ गाड्या मागविण्यात आल्या आहेत.

मुंबईला पश्चिमेकडून उत्तर-दक्षिण जोडणारा मेट्रो ३ हा प्रकल्प वाहतूककोंडीतून मुक्ततेसाठी सर्वोत्तम ठरणार आहे. हा प्रकल्प व्यावसायिकदृष्ट्या दोन टप्प्यात सुरू केला जाणार आहे. पहिला टप्पा आरे ते बीकेसी उत्तर-बीकेसी उत्तर ते आरे, असा असेल. या पहिल्या टप्प्यासाठी एकूण नऊ गाड्या मुंबईत येणार आहेत. वास्तवात या मार्गावरील अखेरचे स्थान सीप्झ असेल. त्यानंतर गाडी आरे कारशेडमध्ये जाईल.

सूत्रांनुसार, दुसरी गाडी लवकरच मुंबईत दाखल होणार आहे. प्रत्येक गाडीची आधी सुमारे १ हजार किमी सक्षमता चाचणी होते. त्यानंतर वेग, संतुलन व आपत्कालीन ब्रेक प्रणाली यांची चाचणी कमाल वेगाने होते. तो वेग जवळपास ताशी ९५ किमी असेल. ही चाचणी फेब्रुवारी २०२३पासून सुरू करण्याचे नियोजन आहे. तर डिसेंबर २०२३पासून पहिला टप्पा सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व नऊ गाड्या जून २०२३ व उर्वरित गाड्या दुसरा टप्पा सुरू होण्याआधी मे २०२४ पर्यंत मुंबईत दाखल होतील.



### कारशेडचे ४५ टक्के काम डिसेंबरपर्यंत

मेट्रो-३ मधील गाड्यांची दुरुस्ती व देखभाल बहुचर्चित ठरलेल्या आरे कारशेडमध्ये होणार आहे. विविध कारणांनी विलंब झालेल्या या कारशेडचे ४५ टक्के काम डिसेंबर २०२२ पर्यंत पूर्ण होण्याचे संकेत आहेत. त्यानंतर सर्व नऊ गाड्या एप्रिल २०२३ पर्यंत या कारशेडमधील सुविधा वापरू शकणार आहेत. तर कारशेडचे काम जुलै २०२३पर्यंत पूर्ण होईल, असे सूत्रांचे म्हणणे आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यातील सर्व गाड्यांची देखभाल व दुरुस्ती आरे कारशेडमध्येच होऊ शकेल, अशी चिन्हे आहेत. पहिला टप्पा सुरू होईपर्यंत केवळ केंद्रीकृत नियंत्रण केंद्र आरेमध्ये सुरू होऊ शकणार नाही. त्यासाठी बीकेसी स्थानक मोठे करून तेथे हे केंद्र उभे होत आहे.